दै. लोकशाही वार्ता, नागपूर वार्ता,

दि. 22 जून 2017, पृ.13

उपराजधानीत आंतरराष्ट्रीय योगदिन उत्साहात

लोकशाही वार्ता/नागपूर

कविकुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठ

कविकुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठातर्फे सीताबर्डीतील मधुरम सभागृहात आंतरराष्ट्रीय योगदिन उत्साहात पार पडला. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. उमा वैद्य तर प्रमुख अतिथी म्हणून संजीवनी योगाचे डॉ. केशव क्षीरसागर यांच्यासह विशेष अतिथी म्हणून आयडीबीआय बँकेचे उपव्यवस्थापक संतोष पोतद्दार, कुलसचिव डॉ. अरविंद जोशी आदी उपस्थित होते. प्रारंभी विद्यापीठाच्या वेद विभागाच्या विद्यार्थिनींनी सस्वर वैदिक मंत्रोच्चारणाचा उद्घोष केला.पदव्युत्तर दर्शनशास्त्र आणि योगशास्त्र विभागातर्फे विशेष योगशिबिरांचे आयोजन करण्यात आले. यावेळी बोलताना संतोष पोतदार म्हणाले, जागतिकीकरणाच्या युगात मनाची चंचलता वाढली असून ती दूर करण्यासाठी योगशास्त्र हा रामबाण उपाय आहे. डॉ. उमा वैद्य म्हणाल्या, योगप्रयोगांनी आधी कर्मेंद्रियांवर मग ज्ञानेंद्रियांवर आणि शेवटी मनावर ताबा मिळविला जातो. योग ही साधना आहे. त्यासाठी शारीरिक व मानसिक कष्टाची गरज असते. योग हा विनामूल्य असल्याने त्याने शारीरिक व मानसिक स्वास्थ्याची प्राप्ती होते. श्रीपाद अभ्यंकर यांनी सादर केलेल्या पसायदानाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. संचालन डॉ. पराग जोशी यांनी तर आभार डॉ. कलापिनी अगस्ती यांनी मानले.